
2 8 FEB 2026

तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तर परीक्षेतील ७५७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर, नोव्हेंबर



२०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या अभ्यासक्रमांचे शुक्रवारी २ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले असून आजअखेर ७५७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. शुक्रवारी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने २ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी १०५ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

28 FEB 2026

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठाच्या सुगम्य विज्ञान उपक्रमांतर्गत स्पर्श, गंध व चवीतून वनस्पतींची ओळख करून घेताना विद्यार्थी. (छाया : मिलन मकानदार)

# दृष्टी दिव्यांगांनी स्पर्श, गंध, चवीतून 'अनुभवले' वनस्पतीजगत

## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त 'सुगम्यविज्ञान' उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने यंदाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी बीजारोपण ते उत्पादन या विषयावर विशेष सुगम्य विज्ञान हा अनोखा उपक्रम घेतला. यानिमित्ताने स्पर्श, गंध, आकार आणि चवीच्या माध्यमातून विविध वनस्पती ओळखण्याचे तंत्र या विद्यार्थ्यांना आत्मसात करता आले. वनस्पतीजगताची अनोखी ओळख व अनुभव विद्यार्थ्यांना घेता आला.

राष्ट्रीय विज्ञान दिनाअंतर्गत यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज व समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित विज्ञान उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना विविध फळे, मसाले, औषधी व सुगंधी वनस्पतींचे स्पर्श, गंध तसेच चव यांच्या माध्यमातून ओळख करून देण्यात आली. उपक्रमात सुशीलाबाई घोडावत अंध विद्यालय (सांगली-मिरज), ज्ञान प्रबोधन भवन संचलित अंध विद्यालय (कोल्हापूर) आणि श्री सद्गुरू धोंडराज निवासी अंध विद्यालय (पलूस) येथील सुमारे शंभर दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. माधुरी वाळवेकर, संयोजक डॉ. एस. आर. यन्कंची, यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसेबिलिटीज व समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वर्षा जाधव आणि डॉ. एस. ए. पाटील यांनी उपक्रमाचे नियोजन केले.

28 FEB 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ७५७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ७५७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी एमबीए., एम.एस्सी. एम.कॉम. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला १०५ विद्यार्थी उपस्थित होते. दि. २७ रोजी पीजी डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 FEB 2026 सकाळ



कोल्हापूर : सुगम्यविज्ञान उपक्रमांतर्गत स्पर्श, गंध व चवीतून वनस्पतींची ओळख करून घेताना दृष्टीदिव्यांग विद्यार्थी.

# दृष्टी दिव्यांगांनी स्पर्शातून 'अनुभवले' वनस्पतीजगत

## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विद्यापीठाचा सुगम्यविज्ञान उपक्रम

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाने यंदाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी 'बीजारोपण ते उत्पादन' या विषयावर विशेष 'सुगम्यविज्ञान' उपक्रम घेतला. याअंतर्गत स्पर्श, गंध, आकार आणि चवीच्या माध्यमातून विविध वनस्पती ओळखण्याचे तंत्र या विद्यार्थ्यांना आत्मसात करता आले. वनस्पती जगताची अनोखी ओळख आणि अनुभव या विद्यार्थ्यांना घेता आला.

यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्रातर्फे दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित विज्ञान उपक्रम राबविण्यात आला. बीजरोपणापासून उत्पादनापर्यंतच्या प्रक्रियेचे प्रात्यक्षिक सादर करत वनस्पतींची वाढ, बियांची रचना, अंकुरण प्रक्रिया, रोपांची निगा आणि शेतीतील उत्पादन याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना विविध फळे, मसाले, औषधी व सुगंधी वनस्पतींचे स्पर्श, गंध तसेच चव यांच्या माध्यमातून ओळख करून दिली.

या उपक्रमात सुशीलाबाई घोडावत अंध विद्यालय (सांगली-मिरज), ज्ञान प्रबोधन भवन संचलित अंध विद्यालय (कोल्हापूर) आणि श्री सद्‌गुरु धोंडीराज निवासी अंध विद्यालय (पलूस) येथील सुमारे शंभर दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यांच्यासोबत त्यांचे शिक्षक आणि पालकही उपस्थित होते. स्पर्श, सुगंध, चव आणि आकार यांच्या आधारे वनस्पती ओळखण्याचा विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रयत्न केला.

कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. माधुरी वाळवेकर, संयोजक डॉ. एस. आर. यंन्कंची, यूजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसेबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वर्षा जाधव आणि डॉ. एस. ए. पाटील यांनी या उपक्रमाचे नियोजन केले.

2 8 FEB 2026

जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योग-शिक्षण क्षेत्रांचा सुसंवाद हवा

## भरत ओसवाल : शिवाजी विद्यापीठात सुसंवाद कार्यक्रम

कोल्हापूर, ता. २७ : 'व्यवसायाच्या अपेक्षा पूर्ण करणारी युवापिढी निर्माण करण्यासाठी उद्योग-शिक्षण क्षेत्रांचा सुसंवाद आवश्यक आहे,' असे प्रतिपादन चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष भरत ओसवाल यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे पीएम-उषा योजनेंतर्गत उद्योग विद्यापीठ सुसंवाद कार्यक्रमात ते बोलत होते. विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते.

श्री. ओसवाल म्हणाले, 'कष्ट आणि काम करण्याची तयारी ठेवल्यास पैसा आपोआप येईल. सुवर्णालंकार व्यवसायातील नवोपक्रम अंगिकारल्यामुळे व्यवसायाचा विकास होत गेला. प्रामाणिकपणावर स्पर्धेत टिकून राहता येते.' डॉ. महाजन म्हणाले, 'शिक्षण क्षेत्राचा उद्योग-व्यवसायाशी संवाद आवश्यक असून, अभ्यासक्रम, संशोधन, आंतरवासिता आणि कर्मचारी




कोल्हापूर : उद्योग विद्यापीठ सुसंवाद कार्यक्रमात बोलताना भरत ओसवाल.

नियुक्ती या गोष्टींसाठी दोन्ही क्षेत्रांना तो लाभदायी आहे.' डॉ. केदार मारुलकर यांनी प्रास्ताविक, डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. दुसऱ्या सत्रात समर्थ ग्रुप ऑफ कॅम्पनीजचे व्यवस्थापकीय संचालक संजय कारखानीस म्हणाले, 'जीवनात तीन एक पर्याय असतात. तो निवडण्यासाठी व्यवसायातील प्रत्यक्ष ज्ञान, कौशल्ये, प्रज्ञा व आणि वृत्ती यांचा अंगीकार करा. तंत्रज्ञानातील बदल आत्मसात करा. दैनिक लघु सुधारणा, पीडीसी सायकल, पेस्टल कॉनतेक्स्त संकल्पनेचा वापर प्रभावी ठरल्याचे त्यांनी सांगितले.

तिसऱ्या सत्रात अ‍ॅडॉप्ट कन्सलटंटचे अमित माटे यांनी व्यवसाय उभारणीसाठी मार्गदर्शन केले. चौथ्या सत्रात पॅनेल चर्चेचे आयोजन केले. सीए गिरीश सामंत, डॉ. महादेव शिंदे, प्रा. डॉ. अनिल सूर्यवंशी, समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी भाग घेतला. युवराज टिपुगडे, मंजिरी कांबळे, प्रेषित कांबळे, धनेश्वरी शिंदे, हरीश कांबळे, भरत रावण, श्री. सूरज, तुषार पाटील, सामी मुल्ला यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 FEB 2026
सकाळ



शिवाजी विद्यापीठ : राष्ट्रीय परिसंवादात बीजभाषण करताना प्रा. रेणू दांडेकर. यावेळी शेजारी डावीकडून डॉ. श्रीकृष्ण महाजन, अशोक कांबळे, जे. बी. कोमाराईह, अविनाश भाले उपस्थित होते.

# 'माणूसपण' जपणारे शिक्षण देण्याची गरज

## प्रा. रेणू दांडेकर : विद्यापीठात राष्ट्रीय परिसंवाद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : 'निर्मितीक्षम आणि रचनात्मक शिक्षणच सर्वांना सक्षम करणारे व सामाजिक समावेशन घडविणारे ठरते. शिक्षणाचा पुनर्विचार करताना 'माणूसपण' जपणारे शिक्षण देणे ही काळाची गरज असून, संवेदनशील शिक्षकच त्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावू शकतात. संवेदनशील, रचनात्मक शिक्षण व्यवस्थेतूनच खऱ्या अर्थाने सामाजिक समावेश शक्य आहे', असे प्रतिपादन पुण्याच्या लोकसाधना संस्थेच्या संस्थापक प्रा. रेणू दांडेकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राने घेतलेल्या 'कोणीही मागे राहू नये, सामाजिक समावेशासाठी शिक्षणाचा



पुनर्विचार' या राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी त्यांचे बीजभाषण झाले. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन, तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डी. ए. सावकार अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. अशोक कांबळे, बनारस हिंदू विद्यापीठ येथील सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. जे. बी. कोमाराईह प्रमुख उपस्थित होते.

डॉ. कांबळे म्हणाले, 'शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये जीवनातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे, तरच निष्पत्तीआधारित मूल्यमापनातून शिक्षणाचा सामाजिक समावेशनासाठी उपयोग होईल.'

डॉ. महाजन म्हणाले, 'शिक्षणाचा सामाजिक समावेशनासाठी सकारात्मक दृष्टिकोनातून विचार होणे आवश्यक आहे. शिक्षण व्यवस्थेने संधी निर्माण केल्यास समाजातील सर्व घटक मुख्य प्रवाहात येऊ शकतात.'

यावेळी शिवाजी राऊत, डॉ. राजू श्रावस्ती, चेतना सोनकांबळे, केदार मारुलकर, विद्यानंद खंडागळे, तेजपाल मोहरेकर, सुप्रिया पाटील, शरद पाटील आदी उपस्थित होते. अविनाश भाले यांनी स्वागत केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.

2 8 FEB 2026

पुढारी

# उद्योग सुसंवादातूनच सक्षम युवापिढी घडणार : ओसवाल




**कोल्हापूर :** 'व्यवसायातील वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी उद्योग आणि शिक्षण क्षेत्रांत सुसंवाद असणे काळाची गरज आहे,' असे प्रतिपादन कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष भारत ओसवाल यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागात 'पीएम-उषा' योजनेंतर्गत आयोजित 'उद्योग-विद्यापीठ सुसंवाद' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ओसवाल यांनी महेंद्र ज्वेलर्सचा प्रवास उलगडताना विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, कष्ट आणि नवोपक्रम आत्मसात करण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी शिक्षण आणि उद्योग क्षेत्रांतील भागीदारी अभ्यासक्रम व संशोधनासाठी लाभदायक असल्याचे सांगितले. दुसऱ्या सत्रात समर्थ ग्रुपचे संजय कारखानीस यांनी तंत्रज्ञानातील बदल आणि ज्ञानाच्या उपयोजनावर भर दिला. तर 'ॲडॉप्ट कन्सल्टंट'चे अमित माटे यांनी व्यवस्थापन सल्लागार व्यवसायाची माहिती दिली. अंतिम सत्रात सीए गिरीश सामंत, डॉ. महादेव शिंदे यांच्यासह मान्यवरांनी पॅनेल चर्चेत सहभाग घेतला. डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत केले, तर डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

28 FEB 2026

पुढारी

# संवेदनशील, रचनात्मक शिक्षणातूनच सामाजिक समावेशन शक्य : प्रा. दांडेकर

**कोल्हापूर :** संवेदनशील, रचनात्मक शिक्षण व्यवस्थेतूनच खऱ्याअर्थाने सामाजिक समावेश शक्य आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या लोकसाधना संस्थेच्या संस्थापक प्रा. रेणू दांडेकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित 'कोणीही मागे राहू नये : सामाजिक समावेशासाठी शिक्षणाचा पुनर्विचार' या राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन समारंभात बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी केंद्र संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डी.ए. सावकार अध्यासनाचे प्रा. डॉ. अशोक कांबळे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. यावेळी डॉ. जे. बी. कोमाराईह, शिवाजी राऊत, डॉ. राजू श्रावस्ती, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. केदार मारुलकर, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. तेजपाल मोहरेकर, डॉ. सुप्रिया पाटील, शरद पाटील आदी उपस्थित होते. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.

28 FEB 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषिक घोटाळे टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठातील परिसंवादात सूर : प्रचलित व्याकरणाचे नियम लक्षात घ्यायला हवेत

**जनप्रवास : कोल्हापूर**

भाषिक घोटाळे आणि उद्भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे, असा सूर शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष परिसंवादामध्ये उमटला.

शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भवनातील मराठी अधिविभाग रांगोळ्या आणि सुवासिक फुलांच्या माळांनी सजला. विद्यार्थ्यांनी सर्व अधिविभाग आकर्षक पद्धतीने सजविला. या आनंदाच्या वातावरणात 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावरील परिसंवाद अतिशय उत्तम रंगला. या परिसंवादात विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीष मोरे यांनी सहभाग घेतला. जनसंपर्क अधिकारी तथा विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात बोलताना डॉ. अनिल गवळी. मंचावर (डावीकडून) डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. गिरीष मोरे व डॉ. नंदकुमार मोरे.**

डॉ. गवळी आणि डॉ. मोरे या दोघांनीही आपल्या भाषणात भारतातील विरामचिन्हांच्या उगमाच्या इतिहासापासून ते सद्यस्थितीपर्यंत साद्यंत आढावा घेतला. डॉ. गवळी म्हणाले, मेजर थॉमस कँडी यांनी १८५०मध्ये स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम, उद्गारचिन्ह आणि प्रश्नचिन्ह ही पाच विरामचिन्हे मराठी भाषेला दिली. थॉमस कँडी यांनी केवळ मोल्सवर्थच्या मराठी इंग्रजी शब्दकोषाचे निर्मितीकार्य सिद्धीस नेले, इतकेच नव्हे, तर इंग्रजी-मराठी शब्दकोषाची निर्मितीही केली. त्याखेरीज येथील इतर शाळांतून इसापनिती, सिंहासन बत्तिशी या पुस्तकांच्या पलिकडे जाऊन वाचन पाठमाला, भाषांतर पाठमाला इत्यादी पुस्तकांचाही अभ्यासक्रमात समावेश करून शिक्षणाला आधुनिक रुप दिले. विरामचिन्हांच्या वापरांबाबतचे अनेक संकेत कँडी यांनी त्यांच्या पुस्तिकेत दिले आहेत, तथापि, विरामचिन्हे वापरताना प्रचलित व्याकरणाचे नियम लक्षात घ्यायला हवेत, अन्यथा घोटाळे होण्याची शक्यता वाढेल. डॉ. गिरीष मोरे यांनी आपले विचार मांडले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, मेजर कँडी यांच्यासारख्या अनेक ब्रिटीश अधिकाऱ्यांनी मराठी भाषा व संस्कृतीची मनोभावे सेवा केली. विरामचिन्हे ही त्यांची अमूल्य देणगी होय.

बोलण्या-लिहीण्यात विरामचिन्हांच्या वापराअभावी अराजक निर्माण होऊ शकते. बा. सी. मर्ढेकर, विलास सारंग, र. कृ. जोशी यांच्या कवितांत विरामचिन्हांचा ठाशीव वापर दिसून येतो. सुरवातीला मृण्मयी पांचाळ या विद्यार्थिनीने मराठी भाषा गौरव गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शन आणि विक्रीचा स्टॉलही मांडण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांचा मराठी भाषेचे विविध पैलू उलगडून दाखविणारा विशेष गुणदर्शन कार्यक्रमही सादर झाला. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक तर प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 FEB 2026
पुढारी

# भाषिक घोटाळे टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य

**● मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठातील परिसंवादात सूर**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भाषिक घोटाळे आणि उद्‌भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष परिसंवादामध्ये उमटला.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावर परिसंवाद झाला. या परिसंवादात विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी, ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीष मोरे यांनी सहभाग घेतला. जनसंपर्क अधिकारी तथा विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात बोलताना डॉ. अनिल गवळी. व्यासपीठावर डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. गिरीष मोरे, डॉ. नंदकुमार मोरे. (छाया : पप्पू अत्तार)**

डॉ. गवळी म्हणाले, भारतात पूर्वी लेखनापेक्षा पाठांतरावर अधिक भर होता. त्यामुळे पाठांतर आणि उच्चारशास्त्र अधिक प्रमाण मानले जाई. मेजर थॉमस कँडी यांनी १८५० मध्ये स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम, उद्गारचिन्ह आणि प्रश्नचिन्ह ही पाच विरामचिन्हे मराठी भाषेला दिली. थॉमस कँडी यांनी केवळ मोल्सवर्थच्या मराठी इंग्रजी शब्दकोषाचे निर्मितीकार्य सिद्धीस नेले, इतकेच नव्हे, तर इंग्रजी-मराठी शब्दकोषाची निर्मितीही केली. त्याखेरीज येथील 'पंतोजींच्या शाळांतून', 'इसापनीती', 'सिंहासन बत्तीशी' या पुस्तकांच्या पलीकडे जाऊन वाचन पाठमाला, भाषांतर पाठमाला इत्यादी पुस्तकांचाही अभ्यासक्रमात समावेश करून शिक्षणाला आधुनिक रुप दिले.

डॉ. गिरीष मोरे म्हणाले, विरामचिन्हे म्हणजे शिस्तीची काटेकोर लेखनसंहिता होय. देशात मौखिक परंपरेतून आलेले साहित्य ऐकण्यात येत असे; पण वाचनात फारसे येत नसे. त्यामुळे विरामचिन्हांऐवजी काही बिघडत नसे. आजच्या काळात मात्र विरामचिन्हांऐवजी निश्चित बिघडू शकते. अर्थ स्पष्टतेसाठी, वाचकाची दमछाक टाळण्यासाठी विरामचिन्हे आवश्यक आहेत.

डॉ. रणधीर शिंदे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 FEB 2026
तरुण भारत

# भाषिक घोटाळे टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य

प्रतिनिधी
कोल्हापूर

भाषिक घोटाळे आणि उद्भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष परिसंवादामध्ये उमटला.

शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भवनातील मराठी अधिविभाग आज रांगोळ्या आणि सुवासिक फुलांच्या माळांनी सजला होता. 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावरील परिसंवाद अतिशय उत्तम रंगला होता. या परिसंवादात विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीष मोरे यांनी सहभाग घेतला. जनसंपर्क अधिकारी तथा विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. गवळी म्हणाले, भारतात पूर्वी लेखनापेक्षा पाठांतरावर अधिक भर होता. त्यामुळे पाठांतर आणि उच्चारशास्त्र अधिक प्रमाण मानले जाई. दीर्घ, ऱ्हस्व, आरोह, अवरोह इत्यादींसह पाठांतर केले जाई. त्यामुळे त्यावेळी विरामचिन्हे नसावीत. प्रचलित पद्यपद्धतीला अनुसरून विसर्ग आणि दंड हीच विरामचिन्हे प्रचलित होती. मेजर थॉमस कँडी यांनी १८५०मध्ये स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम, उद्गारचिन्ह आणि प्रश्नचिन्ह ही पाच विरामचिन्हे मराठी भाषेला दिली. थॉमस कँडी यांनी विरामचिन्हांच्या वापरांबाबतचे अनेक संकेत यांनी त्यांच्या पुस्तिकेत दिले आहेत, तथापि, विरामचिन्हे वापरताना प्रचलित व्याकरणाचे नियम लक्षात घ्यायला हवेत, अन्यथा घोटाळे होण्याची शक्यता वाढेल, असेही ते म्हणाले. डॉ. गिरीष मोरे म्हणाले, वक्त्याच्या बोलण्यात स्वर आणि लय या दोहोंना महत्त्व आहे. बोलण्यातून विरामचिन्हे व्यक्त होतात, तर लेखनातून दृश्यरुपात प्रकट होतात.



कोल्हापूर : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात बोलताना डॉ. अनिल गवळी. मंचावर (डावीकडून) डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. गिरीष मोरे व डॉ. नंदकुमार मोरे.

विरामचिन्हे म्हणजे शिस्तीची काटेकोर लेखनसंहिता होय. आपल्या देशात मौखिक परंपरेतून आलेले साहित्य ऐकण्यात येत असे, पण वाचनात फारसे येत नसे. त्यामुळे विरामचिन्हांऐवजी काही बिघडत नसे. आजच्या काळात मात्र विरामचिन्हांऐवजी निश्चित बिघडू शकते.

जनसंपर्क कक्ष

2 8 FEB 2026 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भाषिक घोटाळे टाळण्यासाठी विरामचिन्हे अनिवार्य

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त परिसंवादात सूर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भाषिक घोटाळे आणि उद्भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे, असा सूर शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष परिसंवादामध्ये उमटला.

शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या वि.स. खांडेकर भवनातील मराठी अधिविभाग रांगोळ्या आणि सुवासिक फुलांच्या माळांनी सजला. विद्यार्थ्यांनी सर्व अधिविभाग आकर्षक पद्धतीने सजविला. या आनंदाच्या वातावरणात 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावरील परिसंवाद रंगला. या परिसंवादात विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीष मोरे यांनी सहभाग घेतला.. डॉ. रणधीर शिंदे अध्यक्षस्थानी होते. जनसंपर्क अधिकारी तथा विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मराठी भाषा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन आणि विक्रीचा स्टॉलही मांडण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांचा विशेष गुणदर्शन कार्यक्रमही सादर झाला.



शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिन समारंभात मराठी अधिविभागाच्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

28 FEB 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकासानेच विकसित भारताचे स्वप्न साकार

## डॉ. एस. महेंद्र देव यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय अर्थमिती परिषद

**भारताने समावेशक आणि शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य उज्ज्वल असून सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल, असे प्रतिपादन भारताच्या पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. एस. महेंद्र देव यांनी केले.**



राष्ट्रीय अर्थमिती परिषदेत मार्गदर्शन करताना पंतप्रधान कार्यालयाच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. एस. महेंद्र देव सोबत डॉ. अनिल कुमार गुप्ता, डॉ. नीरज हातेकर, डॉ. महादेव देशमुख आणि प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), भारतीय अर्थमिती संस्था आणि डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग आणि टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय अर्थमिती संस्था हीरक महोत्सवी (६० व्या) वार्षिक राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. 'भारतीय अर्थव्यवस्था : काल, आज आणि उद्या' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीरज हातेकर अध्यक्षस्थानी होते.

विद्यापीठाच्या प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उद्घाटक म्हणून तर डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. अनिल कुमार गुप्ता प्रमुख उपस्थित होते.

डॉ. देव म्हणाले, जागतिक स्तरावर अनिश्चितता आणि अनेक आव्हाने असली तरी मजबूत देशांतर्गत मागणी, राजकीय स्थैर्य आणि व्यापक आर्थिक स्थैर्य यामुळे भारतीय अर्थव्यवस्था लवचिक राहिली आहे. मात्र, केवळ सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढ पुरेशी नसून समावेशक आणि पर्यावरणपूरक विकासावर भर देणे आवश्यक आहे.

भारताच्या विकासात राज्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून प्रत्येक राज्याने आपल्या क्षमतेनुसार विकासाचे स्वतंत्र उद्दिष्ट निश्चित करणे आवश्यक आहे. देशातील विविध राज्यांमध्ये विकासाची असमानता असल्याने संतुलित प्रादेशिक विकासावर विशेष भर देणे गरजेचे आहे. भारतातील लोकसंख्यात्मक लाभांश ही मोठी संधी असून तिचा योग्य वापर करण्यासाठी कौशल्य विकास, दर्जेदार शिक्षण आणि आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे डॉ देव यांनी स्पष्ट केले.

प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, भारतीय अर्थमिती संस्थेने देशाच्या आर्थिक विकासामध्ये मार्गदर्शकाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. येथून पुढच्या काळात जनुकीय परिवर्तनाधारिक पिके तसेच नवऔषध निर्माणाला जगाच्या अर्थकारणात मोठे महत्त्व प्राप्त होणार आहे. कोविड–१९च्या साथीने त्याची चुणूक आपल्याला दाखविली आहे. त्यामुळे आधुनिक जैवतंत्रज्ञानाच्या युगामध्ये औषधनिर्माण शास्त्रातील संशोधन व विकास या बाबींना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.

अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांनी स्वागत केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. देशमुख यांच्या 'दि थ्री डीज्' या पुस्तकाचे तसेच परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

भारतीय अर्थमिती संस्थेचे सचिव डॉ. के. षण्मुगन यांनी आभार मानले. परिषदेसाठी २२ राज्यांतून ३०० पेक्षा अधिक शिक्षक, अर्थशास्त्रज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी – विद्यार्थिनी उपस्थित होते.

### संशोकांमध्ये व्यापक सहकार्य आवश्यक

डॉ. नीरज हातेकर म्हणाले, आपल्याकडे उपलब्ध असलेल्या प्रचंड अशा स्थाननिहाय आकडेवारीतून अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण प्रवृत्ती आणि विषमता अधिक अचूकपणे समजून घेता येतात; मात्र, यासाठी प्रगत सांख्यिकी व अर्थमिती तंत्रांसह प्रचंड संगणकीय क्षमतेची आवश्यकता असते. भविष्यात संशोधनातील सर्वात मोठे आव्हान हे सॉफ्टवेअर किंवा डेटा नव्हे, तर संगणकीय क्षमता, इंटरनेट गती आणि हार्डवेअर असेल. तसेच, मोठ्या डेटावर आधारित संशोधनासाठी संशोधकांमध्ये व्यापक सहकार्य आणि नेटवर्किंग अत्यावश्यक असून या क्षेत्रात अधिकाधिक संशोधकांनी सहभागी होण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

# भाषिक घोटाळे टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य

● मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठातील परिसंवादात सूर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भाषिक घोटाळे आणि उद्‌भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष परिसंवादामध्ये उमटला.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावर परिसंवाद झाला. या परिसंवादात विद्यापीठाचे माजी अधिष्ठता डॉ. अनिल गवळी, ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीष मोरे यांनी सहभाग घेतला. जनसंपर्क अधिकारी तथा विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात बोलताना डॉ. अनिल गवळी. व्यासपीठावर डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. गिरीष मोरे, डॉ. नंदकुमार मोरे. (छाया : पप्पू अत्तार)**

डॉ. गवळी म्हणाले, भारतात पूर्वी लेखनापेक्षा पाठांतरावर अधिक भर होता. त्यामुळे पाठांतर आणि उच्चारशास्त्र अधिक प्रमाण मानले जाई. मेजर थॉमस कँडी यांनी १८५०मध्ये स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम, उद्गारचिन्ह आणि प्रश्नचिन्ह ही पाच विरामचिन्हे मराठी भाषेला दिली. थॉमस कँडी यांनी केवळ मोल्सवर्थच्या मराठी इंग्रजी शब्दकोषाचे निर्मितीकार्य सिद्धीस नेले, इतकेच नव्हे, तर इंग्रजी-मराठी शब्दकोषाची निर्मितीही केली. त्याखेरीज येथील 'पंतोजींच्या शाळांतून', 'इसापनीती', 'सिंहासन बत्तीशी' या पुस्तकांच्या पलीकडे जाऊन वाचन पाठमाला, भाषांतर पाठमाला इत्यादी पुस्तकांचाही अभ्यासक्रमात समावेश करून शिक्षणाला आधुनिक रुप दिले.

डॉ. गिरीष मोरे म्हणाले, विरामचिन्हे म्हणजे शिस्तीची काटेकोर लेखनसंहिता होय. देशात मौखिक परंपरेतून आलेले साहित्य ऐकण्यात येत असे; पण वाचनात फारसे येत नसे. त्यामुळे विरामचिन्हांऐवजी काही बिघडत नसे. आजच्या काळात मात्र विरामचिन्हांऐवजी निश्‍चित बिघडू शकते. अर्थ स्पष्टतेसाठी, वाचकाची दमछाक टाळण्यासाठी विरामचिन्हे आवश्यक आहेत.

डॉ. रणधीर शिंदे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

# भाषिक घोटाळे टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठातील परिसंवादात सूर : प्रचलित व्याकरणाचे नियम लक्षात घ्यायला हवेत

**जनप्रवास : कोल्हापूर**

भाषिक घोटाळे आणि उद्‌भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे, असा सूर शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष परिसंवादामध्ये उमटला.

शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भवनातील मराठी अधिविभाग रांगोळ्या आणि सुवासिक फुलांच्या माळांनी सजला. विद्यार्थ्यांनी सर्व अधिविभाग आकर्षक पद्धतीने सजविला. या आनंदाच्या वातावरणात 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावरील परिसंवाद अतिशय उत्तम रंगला. या परिसंवादात विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीष मोरे यांनी सहभाग घेतला. जनसंपर्क अधिकारी तथा विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात बोलताना डॉ. अनिल गवळी. मंचावर (डावीकडून) डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. गिरीष मोरे व डॉ. नंदकुमार मोरे.**

डॉ. गवळी आणि डॉ. मोरे या दोघांनीही आपल्या भाषणात भारतातील विरामचिन्हांच्या उगमाच्या इतिहासापासून ते सद्यस्थितीपर्यंत साद्यंत आढावा घेतला. डॉ. गवळी म्हणाले, मेजर थॉमस कँडी यांनी १८५०मध्ये स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम, उद्‌गारचिन्ह आणि प्रश्नचिन्ह ही पाच विरामचिन्हे मराठी भाषेला दिली. थॉमस कँडी यांनी केवळ मोल्सवर्थच्या मराठी इंग्रजी शब्दकोषाचे निर्मितीकार्य सिद्धीस नेले, इतकेच नव्हे, तर इंग्रजी-मराठी शब्दकोषाची निर्मितीही केली. त्याखेरीज येथील इतर शाळांतून इसापनिती, सिंहासन बत्तिशी या पुस्तकांच्या पलिकडे जाऊन वाचन पाठमाला, भाषांतर पाठमाला इत्यादी पुस्तकांचाही अभ्यासक्रमात समावेश करून शिक्षणाला आधुनिक रुप दिले. विरामचिन्हांच्या वापरांबाबतचे अनेक संकेत कँडी यांनी त्यांच्या पुस्तिकेत दिले आहेत, तथापि, विरामचिन्हे वापरताना प्रचलित व्याकरणाचे नियम लक्षात घ्यायला हवेत, अन्यथा घोटाळे होण्याची शक्यता वाढेल. डॉ. गिरीष मोरे यांनी आपले विचार मांडले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, मेजर कँडी यांच्यासारख्या अनेक ब्रिटीश अधिकाऱ्यांनी मराठी भाषा व संस्कृतीची मनोभावे सेवा केली. विरामचिन्हे ही त्यांची अमूल्य देणगी होय.

बोलण्या-लिहीण्यात विरामचिन्हांच्या वापराअभावी अराजक निर्माण होऊ शकते. बा. सी. मर्ढेकर, विलास सारंग, र. कृ. जोशी यांच्या कवितांत विरामचिन्हांचा ठाशीव वापर दिसून येतो. सुरवातीला मृण्मयी पांचाळ या विद्यार्थिनीने मराठी भाषा गौरव गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शन आणि विक्रीचा स्टॉलही मांडण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांचा मराठी भाषेचे विविध पैलू उलगडून दाखविणारा विशेष गुणदर्शन कार्यक्रमही सादर झाला. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक तर प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देशमुख यांनी आभार मानले.

# भाषिक घोटाळे टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भाषिक घोटाळे आणि उद्भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष परिसंवादामध्ये उमटला.

शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भवनातील मराठी अधिविभाग आज रांगोळ्या आणि सुवासिक फुलांच्या माळांनी सजला होता. 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावरील परिसंवाद अतिशय उत्तम रंगला होता. या परिसंवादात विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीष मोरे यांनी सहभाग घेतला. जनसंपर्क अधिकारी तथा विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. गवळी म्हणाले, भारतात पूर्वी लेखनापेक्षा पाठांतरावर अधिक भर होता. त्यामुळे पाठांतर आणि उच्चारशास्त्र अधिक प्रमाण मानले जाई. दीर्घ, ऱ्हस्व, आरोह, अवरोह इत्यादींसह पाठांतर केले जाई. त्यामुळे त्यावेळी विरामचिन्हे नसावीत. प्रचलित पद्यपद्धतीला अनुसरून विसर्ग आणि दंड हीच विरामचिन्हे प्रचलित होती. मेजर थॉमस कँडी यांनी १८५०मध्ये स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम, उद्गारचिन्ह आणि प्रश्नचिन्ह ही पाच विरामचिन्हे मराठी भाषेला दिली. थॉमस कँडी यांनी विरामचिन्हांच्या वापरांबाबतचे अनेक संकेत यांनी त्यांच्या पुस्तिकेत दिले आहेत, तथापि, विरामचिन्हे वापरताना प्रचलित व्याकरणाचे नियम लक्षात घ्यायला हवेत, अन्यथा घोटाळे होण्याची शक्यता वाढेल, असेही ते म्हणाले. डॉ. गिरीष मोरे म्हणाले, वक्त्याच्या बोलण्यात स्वर आणि लय या दोहोंना महत्त्व आहे. बोलण्यातून विरामचिन्हे व्यक्त होतात, तर लेखनातून दृश्यरुपात प्रकट होतात.



**कोल्हापूर : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित परिसंवादात बोलताना डॉ. अनिल गवळी. मंचावर (डावीकडून) डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. गिरीष मोरे व डॉ. नंदकुमार मोरे.**

विरामचिन्हे म्हणजे शिस्तीची काटेकोर लेखनसंहिता होय. आपल्या देशात मौखिक परंपरेतून आलेले साहित्य ऐकण्यात येत असे, पण वाचनात फारसे येत नसे. त्यामुळे विरामचिन्हांऐवजी काही बिघडत नसे. आजच्या काळात मात्र विरामचिन्हांऐवजी निश्चित बिघडू शकते.

# भाषिक घोटाळे टाळण्यासाठी विरामचिन्हे अनिवार्य

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त परिसंवादात सूर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भाषिक घोटाळे आणि उद्‌भवू शकणारे अप्रयोजित विनोद टाळण्यासाठी विरामचिन्हांचा वापर अनिवार्य आहे, असा सूर शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित विशेष परिसंवादामध्ये उमटला.

शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या वि.स. खांडेकर भवनातील मराठी अधिविभाग रांगोळ्या आणि सुवासिक फुलांच्या माळांनी सजला. विद्यार्थ्यांनी सर्व अधिविभाग आकर्षक पद्धतीने सजविला. या आनंदाच्या वातावरणात 'विरामचिन्हांचा वापर आणि महत्त्व' या विषयावरील परिसंवाद रंगला. या परिसंवादात विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. अनिल गवळी आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीष मोरे यांनी सहभाग घेतला. डॉ. रणधीर शिंदे अध्यक्षस्थानी होते. जनसंपर्क अधिकारी तथा विद्यापीठाचे मराठी भाषा अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मराठी भाषा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन आणि विक्रीचा स्टॉलही मांडण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांचा विशेष गुणदर्शन कार्यक्रमही सादर झाला.



शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिन समारंभात मराठी अधिविभागाच्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.